# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102

E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


महत्वाचे

क्रमांक 2अ/एडीएम/2017/ ४५७

दिनांक : 10 MAY 2017

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे.

विषय : शैक्षणिक वर्ष 2016-17 करिता Seat Acceptance Fee बाबत

संदर्भ : राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचे परिपत्रक क्रमांक

01.CET CELL/Circular-Refund/Technical/191/2017 दिनांक 30.03.2017

02. CET CELL/Circular-Refund/Technical/192/2017 दिनांक 30.03.2017

03. CET CELL/Circular-Refund/Technical/193/2017 दिनांक 30.03.2017

शैक्षणिक वर्ष 2016-17 करिता सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांकडून रु.5000/- (एस.सी. व एस.टी. प्रवर्गातील उमेदवार वगळता) Seat Acceptance Fee धनाकर्षाद्वारे विविध केंद्रावर स्विकारण्यात आली होती. सदर शुल्क संबंधित संस्था अथवा विद्यार्थी यांना अदा करण्याकरिता आवश्यक धनाकर्ष तसेच न वठविलेले धनाकर्ष संबंधित विभागीय कार्यालयाकडे दिनांक 31.03.2017 रोजी सूपूर्द करण्यात आलेले आहेत. तसेच याबाबत करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात आवश्यक सुचना राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्या संदर्भिय परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत.

Seat Acceptance Fee बाबत सर्व आवश्यक सुचना संदर्भिय परिपत्रकान्वये तसेच दिनांक 31.03.2017 च्या बैठकीत दिलेल्या असून सुद्धा सदर सुचनांचे तंतोतंत पालन होत नसल्याचे संचालनालयाच्या निदर्शनास आलेले आहे. तसेच यासंदर्भात चुकीची बातमी दिव्य मराठी व महाराष्ट्र टाईम्स वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झालेली आहे. या पार्श्वभूमीवर आपणास कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांनी Allotted संसथेमध्ये Reporting केले आहे मात्र त्यांचा धनाकर्ष वठलेला नाही अशा उमेदवारांच्या धनाकर्षाबाबत सुचना संदर्भ क्रमांक 3च्या परिपत्रकामध्ये शेवटच्या परिच्छेदामध्ये देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार धनाकर्ष संबंधित उमेदवाराला परत देण्यात यावा. व धनाकर्ष संबंधित बँकेकडून रद्द करण्याच्या सुचना त्यांना द्याव्यात. रद्द केलेल्या धनाकर्षाची रक्कम संबंधित संस्थेने विद्यार्थ्याकडून घ्यावी व सदर रक्कम त्यांनी त्यांच्याकडे ठेवावी जेणेकरुन राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून संबंधित संस्थेला शुल्क अदा करण्याची आवश्यकता पडणार नाही. तथापि याबाबत दिलेल्या सुचनांचे पालन करताना विद्यार्थ्यांच्या सत्र परीक्षा सुरु असल्यामुळे तातडीने शुल्क भरण्यास किंवा शुल्क धनाकर्षाद्वारे भरण्यास विद्यार्थ्यांना ऐन परीक्षेच्या कालावधीत आग्रह करण्यात येऊ नये अशा सुचना आपल्या विभागातील सर्व संस्थाना आपल्यास्तरावर देण्यात याव्यात. विद्यार्थ्यांच्या सत्र परीक्षा संपेपर्यंत विद्यार्थ्यांना सवड द्यावी. जेणेकरुन विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान कोणताही त्रास होणार नाही.

(चंद्रशेखर ओक, भा.प्र.से.)

संचालक,

तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : माहितीकरिता

01. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष व प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई 400 051.

02. कार्यासन क्रमांक 3, तंत्रशिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई .

---

पृ.क्र.तंशिस/प्राकाना/शैवि/2017/ 1251

सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर

दिनांक:- 15 /05/2017

प्रति,

प्राचार्य/संचालक

सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था,

नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात नमुद केल्यानुसार Seat Acceptance ची फी विद्यार्थ्यांना अदा करण्याबाबत कार्यवाही करावी.

(पुलकेशराव ठाकरे)

सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

नागपूर